**<u>जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या अमरावती जिल्हयातील ४५ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. १८.०१.२०२३ रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त</u>**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेकडून अमरावती जिल्हयातील ४५ रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. १८.०१.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, आघात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. ०९ जुन २०२१ रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी आदेश क्र. E-01 of 2023 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-230104-FTS-0181 दि. ०४.०१.२०२३ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. श्रीमती पवनीत कौर, जिल्हादंडाधिकारी, अमरावती — अध्यक्ष
२. मा. श्री रामदास सिदधभटटी, अप्पर जिल्हाधिकारी, अमरावती
३. श्री. रा. आ. राजपूत, प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
४. श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, अमरावती-१ — समन्वयक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. १६.१२.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. १८.०१.२०२३ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हाधिकारी मा. श्रीमती पवनीत कौर यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे समन्वयक श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-१ यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अमरावती जिल्हयातील ४५ रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अमरावती यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील

नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, २रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-४०००२२.
२. प्रादेशिक कार्यालय/उपप्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
३. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, जिल्हा परिषद, अमरावती, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती.
४. जिल्हयातील सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये सर्व पंचायत समिती कार्यालये व संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, दोनोडा खैरी/ शहापूर व सावळी बु./ सावळापूर/ हिवरापूर्णा व येलकीपूर्णा/ येसुर्णा व निंभारी/ ता. अचलपूर, राजुरवाडी, ता. मोर्शी, नायगाव / बोरगाव निस्ताने/ गोकुळसरा/ दिघी महल्ले, ता. धामणगाव रेल्वे, खा-या टेंभरू/ चिचघाट/ रत्नापूर, ता. धारणी, वाठोडा शु./ सोनारखेडा/ भालसी/ ढंगारखेडा/ गणोजा देवी/ दाढी/ कानफोडी/ नांदेड खु./ पूर्णानगर, ता. भातकुली, नांदेड बु./ खैरी/ नलवाडा/ चांडोळा/ करतखेड/ लासुर/ रामतीर्थ/ वडूरा, ता. दर्यापूर, जावरा फत्तेपूर/ भारवाडी/ उंबरखेड/ धामंत्री, ता. तिवसा, हिरूळ पूर्णा/ तळणी पूर्णा/ टाकरखेडा, ता. चांदूर बाजार जि. अमरावती

श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, अमरावती-१ यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी एनव्हायरो टेक्नो कन्सल्टंट प्रा.लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्रीमती धनश्री पाटील, उपप्रादेशिक अधिकारी अमरावती-१ यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

श्री अमोल जाधव, सरपंच, लासुर, ता. दर्यापूर यांनी सांगीतले की, सन २०२१ वर्षी पूर्णा नदीच्या रेतीघाटांच्या झालेल्या लिलावमधून मिळणारा ५ ते १० टक्के निधी ग्रामपंचायतला मिळालेला नाही. याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती यांनी सांगीतले की, हा विषय सदर जनसुनावणी संबंधी नाही तसेच सदरचा निधी मागील काही वर्षापासून ग्रामपंचायतला थेट वळती करणे बंद करण्यात आलेला आहे. स्वामित्वधनाचे 10 टक्के निधी हा जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF) मध्ये जमा करण्यात येतो व तो जिल्हयातील खाणबाधीत क्षेत्रातील विकासाकरीता वापरण्यात येतो. गावातील विकासाबाबत काही प्रस्ताव असल्यास ते मा. जिल्हाधिकारी कार्यालयास दिल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मा. अध्यक्षा यांनी सुचित केले की, सदर लोकसुनावणीमधे सध्याच्या ४५ रेतीघाटांबाबत काही आक्षेप किंवा सुचना असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

श्री अमोल जाधव, सरपंच, लासुर, ता. दर्यापूर यांनी पूढे सांगीतले की, रेती घाटांवरून रेती वाहून नेणा-या वाहनांच्या सकाळी ८ ते सायंकाळी ५ च्या वेळेत बदल करण्यात यावा. या वेळेत

याबाबत अप्पर जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सांगीतले की, आपल्या शेतीचा गट नंबर देण्यात यावा व जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन दिल्यास त्यावर चौकशी करून उपाययोजना करण्यात येईल.

मा. अध्यक्ष यांनी उपरोक्त विषयाबाबत लेखी निवेदन देण्यात यावे असे सुचविले व मा. अप्पर जिल्हाधिकारी यांना याबाबत चौकशी करण्याबाबत सुचित केले.

श्री राम निस्ताने, बोरगाव निस्ताने, ता. धामणगाव रेल्वे यांनी सांगीतले की, त्यांची घरे नदीच्या काठावर आहेत. रेती वाहून नेणा-या वाहनांमधे क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात रेती वाहून नेल्या जाते. त्यामुळे घरांना तडे गेले आहेत. सदर रेतीघाट लिलावाला विरोध आहे.

मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, याबाबत संबंधीत तहसिलदारांकडून चौकशी करून अहवाल मागविण्यात येईल व योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

( धनश्री पाटील )
समन्वयक
तथा
उप- प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, अमरावती-१

( रा. आ. राजपूत )
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, अमरावती

( पवनीत कौर )
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हाधिकारी, अमरावती